# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६८०४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि-१३/विवि/२०६/२०२४
दिनांक : ०४.१०.२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

श्रीमती को. गा म महा
आवक क्रमांक ९०५/२०२४
दिनांक ०४/१०/२०२४

**विषय : गांधी विचार संस्कार परीक्षा घेण्याबाबत..**
संदर्भ : गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगांव यांचे पत्र क्र.निरंक दिनांक २३ सप्टेंबर, २०२४

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, गांधी रिसर्च फाऊंडेशन द्वारा गांधी विचारांचा युवकांमध्ये प्रचार-प्रसार व्हावा या उद्देशाने गांधी विचार संस्कार परीक्षा घेण्यात येणार आहे.

यासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, गांधी विचार रिसर्च फाऊंडेशन मार्फत आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेस आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना बसविण्यास प्रोत्साहित करावे.

आपल्या सुलभ माहितीकरीता सहपत्रानुसार स्पर्धेचे माहितीपत्रक सोबत जोडण्यात येत आहे. सोबतचे परिपत्रक अवलोकावे व त्यानुसार आपण आपले स्तरावर कार्यवाही करावी, तसेच अधिक माहितीकरीता श्री.गिरीष कुळकर्णी, परीक्षा नियंत्रक, गांधी विचार संस्कार परीक्षा,संपर्क क्रमांक ९८२३३३४०८४ यांचेशी संपर्क साधावा, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.राजीव बोरकर)
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र :** गांधी विचार संस्कार परीक्षा-माहितीपत्रक

प्रतिलिपी :
१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२. प्र.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

आवश्यक सादर
४/१०/२४

गांधी रिसर्च फाउण्डेशन

# गांधी विचार संस्कार परीक्षा २०२४

## गांधी विचार संस्कार परीक्षा (जीव्हीएसपी) - माहितीपत्रक

१. **गांधी विचार संस्कार परीक्षेचे (जीव्हीएसपी) माध्यम मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व कन्नड असेल.**

२. इ. ५ वी ते पदव्युत्तर अंतिम वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक व प्राध्यापकांनाही या परीक्षेत सहभागी होता येईल.

३. प्रत्येक इयत्तेसाठी विविध जीवनमूल्यांची ओळख करुन देणा-या विचारांवर आधारित अभ्यासक्रमाचे स्वतंत्र पुस्तक असेल.

४. परीक्षेत एकूण गुणांपैकी १० गुण दिर्घोत्तरी प्रश्नासाठी असतील व उर्वरित प्रश्न हे बहुपर्यायी असतील.

५. विद्यार्थ्यांकडून परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या पुस्तकासाठी नाममात्र पुस्तक शुल्क आकारण्यात येते.

६. आपल्या शाळा/महाविद्यालयात या परिक्षांचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी शिक्षक/प्राध्यापकांची (विद्यार्थी संख्येनुसार) 'परीक्षा समन्वयक' म्हणून नियुक्ती करावी. त्या परीक्षा समन्वयकाकडे इयत्तेनुसार याद्या बनविणे, पुस्तक शुल्क जमा करुन योग्य त्या माहितीसह फाउण्डेशनकडे पाठविणे, आलेली पुस्तके वाटप करणे, परीक्षा आयोजित करणे, उत्तर पत्रिका तपासणे, निकाल तयार करुन गांधी रिसर्च फाउण्डेशनकडे पाठविणे आदी जबाबदा-या असतील.

७. **इयत्तानिहाय पुस्तकांचे नाव, भाषा व पुस्तक शुल्क पुढीलप्रमाणे राहतील -**

| इयत्ता | पुस्तकाचे नांव व भाषा | | | पुस्तक शुल्क |
|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | |
| ५ वी | गांधीजींच्या आठवणी | गाँधी बाबा | Our Bapu | ४०/- |
| ६ वी | चिरंतन प्रकाश देणारी ज्योत-महात्मा गांधी | गाँधीजी | Gandhiji | ४०/- |
| ७ वी | महात्मा गांधी-एक जीवन दर्शन | बापू मेरी मां | Bapu My Mother | ४०/- |
| ८ वी | गांधीजींचे विद्यार्थी जीवन | गाँधी कथा | Gandhi Katha | ४०/- |
| ९ वी | गांधीजींचा विद्यार्थ्यांना संदेश | गाँधी गंगा | Gandhi Ganga | ४०/- |
| १० वी | एकादश व्रत दर्शन | गाँधीजी का जीवन उन्हींके शब्दों में | Gandhi's Life in His Own Words | ४०/- |
| ११ वी | राष्ट्रनिर्माता बापू | मंगल प्रभात | From Yeravda Mandir | ५०/- |
| १२ वी | गांधी व्यक्तित्व | आरोग्य की कुँजी | Key to Health | ५०/- |
| प्रथम वर्ष | मोहन ते महात्मा | रचनात्मक कार्यक्रम | Constructive Programme | ५०/ |
| द्वितीय वर्ष | सत्याग्रही बापू | पंचायत राज | Panchayat Raj | ५०/- |
| तृतीय वर्ष | हिंद-स्वराज्य | हिन्द स्वराज | Hind Swaraj | ५०/- |
| चतुर्थ वर्ष/पीजी/डी.एड/बी.एड-१ | - | संक्षिप्त आत्मकथा | - | ५०/- |
| पी.जी./डी.एड/बी.एड-२ | - | नेतृत्व की संकल्पना | - | ५०/- |
| शिक्षक/प्राध्यापक | - | बुनियादी शिक्षा | - | १००/- |

८. फाउण्डेशन तर्फे पुस्तके, प्रश्नपत्रिका, नमुना उत्तरपत्रिका आदी सर्व साहित्य एस. टी. पार्सल अथवा पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल. पुस्तके प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुरेसा वेळ द्यावा व त्यानंतर परीक्षा आयोजित करावी.

९. परीक्षा व्यवस्थापन, पोस्टेज व इतर अन्य बाबी यासाठी जो खर्च येतो त्यासाठी विद्यार्थ्यांकडून जमा झालेल्या एकूण पुस्तक शुल्कापैकी २० टक्के रक्कम समन्वयकाने स्वतःकडे राखून ठेवावी. उर्वरित ८० टक्के रक्कम सोबतच्या प्रपत्र - अ भरुन **दि. १५-१०-२०२४** पर्यंत पाठवावे. प्रपत्र - अ व ड, इ ची एक झेरॉक्स प्रत समन्वयक शिक्षकांनी / प्राध्यापकांनी आपल्याकडे माहितीस्तव ठेवावी.

१०. आपल्याकडील २० टक्के रकमेतील परीक्षा, पोस्टेज, झेरॉक्स इ. खर्च करुन उर्वरीत शिल्लक राहिलेल्या रकमेतून आपण समन्वयक, परीक्षक, पेपर तपासणीस यांच्यासाठी मानधन म्हणून खर्च करु शकतात.

११. पुस्तक शुल्काची ८० टक्के रक्कम आपणांस '**गांधी रिसर्च फाउण्डेशन**' च्या खालील खात्यावर जमा करता येईल किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतून आपण आमच्या ॲक्सीस बँक (AXIS Bank), जळगावच्या खात्यावर NEFT/RTGS करु शकता किंवा आपण भ्रमणध्वनी क्र. 9130036467 या नंबरवर BHIM ॲपद्वारा UPI ट्रान्सफर ही करु शकता अथवा GOOGLE PAY, PHONEPE, PAYTM, AMAZON PAY, MOBIKWIK आदी ॲप द्वारा खालील QR Code Scan करूनही पेमेंट करू शकता.

| | | |
|---|---|---|
| खातेदाराचे नांव : गांधी रिसर्च फाउण्डेशन<br>बँक : ॲक्सीस बँक<br>शाखा : पटेल प्लाझा, जळगांव<br>खाते क्र. : 912010045398136;<br>IFSC Code : UTIB0000174 | | QR CODE |

किंवा हे शक्य नसल्यास 'गांधी रिसर्च फाउण्डेशन, जळगाव' या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या डी. डी. द्वारा पुस्तक शुल्क पाठविता येईल. बँक खात्यावर हे शुल्क जमा केल्यास किंवा NEFT/RTGS केल्यास भरणा पावतीची झेरॉक्स विद्यार्थ्यांच्या यादीसोबत पाठविणे अनिवार्य आहे. मोबाईलद्वारे पेमेंट केल्यास त्याचा स्क्रीनशॉट व्हाटसएप द्वारे पाठवावा. (**चेक स्वीकारला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**)

१२. गांधी विचार संस्कार परीक्षेत नोंदणी करुन पैसे भरल्यानंतर **सर्व शाळा व महाविद्यालयांनी** सोबत दिलेल्या गुगल लिंक वर **जावून माहिती भरणे आवश्यक आहे.** त्यानंतरच पुस्तके पाठविण्यात येतील. आपण भरलेल्या रकमेची तपासणी करण्यासाठी गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे. **माहिती भरण्यासाठी गुगल लिंक *https://forms.gle/ZZnMmWFMuEK559K27***

१३. **अत्यल्प आर्थिक उत्पन्न** गटातील विद्यार्थी असल्यास प्रपत्र ड व इ भरुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या (बीपीएल **रेशनकार्ड/ अल्प उत्पन्नाचा दाखला किंवा शिक्षण अधिका-याने साक्षांकीत केलेली विद्यार्थी यादी**) छायाप्रतीसह **सोबतच पाठवावे.** सदर कागदपत्रांची पडताळणी केल्यावर पात्र विद्यार्थ्यांना परीक्षेचे साहित्य पाठविण्यात येईल.

१४. आपणाकडून पुस्तक शुल्क आणि प्रपत्र अ, ड व इ मिळाल्यानंतर शाळा/महाविद्यालयाचे नांव रजिस्टर होईल. त्यानंतर विद्यार्थी संख्येनुसार अभ्यासाची पुस्तके, प्रश्नपत्रिका व नमूना उत्तरपत्रिका फाउण्डेशनकडून पाठविण्यात येतील.

१५. **ज्या शाळा / महाविद्यालयांना प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांची नावे छापून हवी असतील त्यांनी परीक्षा घेतल्यानंतर परीक्षेस उपस्थित विद्यार्थ्यांची यादी** Excel मध्ये **Arial Unicode Font मध्ये टाईप करुन पाठवावी. (नावे जशीच्या तशी छापली जातील. त्यामुळे यादीतील नावे बिनचूक असावे).**

१६. शाळा/महाविद्यालयांनी परीक्षा **३० नोव्हेंबर** २०२४ पूर्वी आयोजित करावयात. (२ ऑक्टोबर २०२४ महात्मा गांधीजींच्या जयंतीचे औचित्य साधून परीक्षा आयोजित करणे उचित ठरेल)

१७. परीक्षेनंतर लगेचच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासून प्रत्येक इयत्तेतील प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका, सर्व उपस्थित विद्यार्थ्यांची गुण यादी (प्रपत्र-क प्रमाणे) मुख्याध्यापकांच्या/प्राचार्यांच्या स्वाक्षरीने व विद्यार्थ्यांचा परीक्षा देतांनाचा फोटो दि. **१६ डिसेंबर २०२४** पर्यंत फाउण्डेशनकडे पाठवावा. या परीक्षेची माहिती स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित झाल्यास सदर वृत्तपत्राचे कात्रण व परीक्षेसंबंधी आपल्या काही सुचना / अभिप्राय असल्यास फाउण्डेशनकडे पाठवावे. तसेच या परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांचे गांधी विचारांमुळे त्यांच्या जीवनातील बदलांचेही अभिप्राय वा मनोगते त्यांच्या स्वहस्ताक्षरात लिहून पाठविल्यास उत्तम.

१८. सर्व शाळा / महाविद्यालयांकडून प्राप्त निकालांमधून प्रत्येक जिल्हास्तरावर इयत्तानिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणा-या विद्यार्थ्यांना विशेष मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. इतर सर्व विद्यार्थ्यांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र, समन्वयक शिक्षक / प्राध्यापकांना सहकार्याबद्दल प्रशस्तीपत्र व सर्व शाळा / महाविद्यालयांना यशस्वी आयोजनाबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

१९. **परीक्षेसाठीच्या महत्त्वाच्या तारखा -**

| | |
|---|---|
| प्रपत्र अ, ड आणि इ गांधी रिसर्च फाउण्डेशनकडे पाठविण्याची अंतिम तारीख | **१५ ऑक्टोबर २०२४** |
| परीक्षा आयोजित करण्याची अंतिम तारीख | **३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत** |
| निकाल पाठविण्याची (प्रपत्र - क भरुन) अंतिम तारीख | **१६ डिसेंबर २०२४** |
| अंतिम निकाल घोषित करण्याची तारीख | **३० डिसेंबर २०२४** |

२०. उपरोक्त नियम व सूचनांमध्ये बदल करण्याचा अधिकार गांधी रिसर्च फाउण्डेशनकडे राखीव असेल.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

गांधी रिसर्च फाउण्डेशन

# गांधी रिसर्च फाउण्डेशन



## गांधी विचार संस्कार परीक्षा २०२४

प्रपत्र - अ

### अ) शाळा/महाविद्यालयाचा तपशील

संस्थेचे नांव : ____________________

शाळा/महाविद्यालयाचे नांव : ____________________

शाळा/महाविद्यालयाचा पत्ता : ____________________

गाव: ______ तालुका: ______ जिल्हा: ______ पिन: ☐☐☐☐☐☐

ई-मेल: ____________________ फोन नं.: ____________

आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची एकूण संख्या: ______ जीव्हीएसपीत दाखलेले एकूण विद्यार्थी: ______ विद्यार्थिनी: ______

मुख्याध्यापक/प्राचार्यांचे नांव : ____________________ मोबाईल नंबर Whatapp No.: ____________

समन्वयकाचे नांव : ____________________ मोबाईल नंबर Whatapp No.: ____________

आमची संस्था महात्मा गांधी स्वच्छ शाळा स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिते.: हो ☐ / नाही ☐

### ब) विद्यार्थी संख्येचा तपशिल

| इयत्ता | पुस्तकाचे नाव भाषा - (मराठी/हिंदी/इंग्रजी) | पुस्तक शुल्क | माध्यमानुसार विद्यार्थी मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण विद्यार्थी | एकूण पुस्तक शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ वी | गांधीजींच्या आठवणी / गाँधी बाबा / Our Bapu | ४०/- | | | | | |
| ६ वी | चिरंतन प्रकाश देणारी ज्योत-महात्मा गांधी / गाँधीजी / Gandhiji | ४०/- | | | | | |
| ७ वी | महात्मा गांधी-एक जीवन दर्शन / बापू मेरी माँ / Bapu My Mother | ४०/- | | | | | |
| ८ वी | गांधीजींचे विद्यार्थीजीवन / गाँधी कथा / Gandhi Katha | ४०/- | | | | | |
| ९ वी | गांधीजींचा विद्यार्थ्यांना संदेश / गाँधी गंगा / Gandhi Ganga | ४०/- | | | | | |
| १० वी | एकादश व्रत दर्शन / गाँधीजी का जीवन उन्हीके शब्दो में / Gandhi's Life in His Own Words | ४०/- | | | | | |
| ११ वी | राष्ट्रनिर्माता बापू / मंगल प्रभात / From Yeravda Mandir | ५०/- | | | | | |
| १२ वी | गांधी व्यक्तित्व / आरोग्य की कुंजी / Key to Health | ५०/- | | | | | |
| प्रथम वर्ष | मोहन ते महात्मा / रचनात्मक कार्यक्रम / Constructive Programme | ५०/- | | | | | |
| द्वितीय वर्ष | सत्याग्रही बापू / पंचायत राज / Panchayat Raj | ५०/- | | | | | |
| तृतीय वर्ष | हिंद-स्वराज्य / हिन्द स्वराज / Hind Swaraj | ५०/- | | | | | |
| चतुर्थ वर्ष/पी.जी./ डि.एड/बी.एड-१ | संक्षिप्त आत्मकथा (हिंदी) | ५०/- | - | | - | | |
| पी.जी./डि.एड/बी.एड-२ | नेतृत्व की संकल्पना | ५०/- | - | | - | | |
| शिक्षक/प्राध्यापक | बुनियादी शिक्षा | १००/- | - | | - | | |
| | एकूण | | | | | | |
| | २०% रक्कम | | | | | | |
| | एकूण पाठवायची ८०% रक्कम | | | | | | |

### क) पुस्तक शुल्क तपशील:
बँकेत भरणा (NEFT/RTGS): ☐ डी.डी.: ☐ चेक: ☐ UPI: ☐ रक्कम: रु. ______

बँकेचे नांव: ____________________ डी.डी. नं.: ____________ बँकेत पुस्तक शुल्क जमा केल्याची तारीख: / /२०

ऑनलाईन पैसे जमा करणाऱ्या खातेदाराचे नांव : ____________________

Transation No.: ____________________

समन्वयक सही | शाळा/महाविद्यालयाचा शिक्का | मुख्याध्यापक/प्राचार्यांची सही